सकाळ | eSakal.com

**'स्मार्ट सिटी' स्पर्धेत पुणे शहर उणे?**

- -

सोमवार, 1 डिसेंबर 2014 - 08:08 AM IST

**पुणे** - "स्मार्ट सिटी‘ म्हणजे काय हो कारभारी अन्‌ त्यासाठी काय करायचं आहे? या प्रश्‍नाला सध्या तरी "जाणकार‘ पुण्यातून उत्तर मिळत नाही. पालिका दरबारीदेखील यावर कसलीच चर्चा सुरू नाही, त्यामुळे देशभर सुरू झालेल्या "स्मार्ट‘ स्पर्धेत पुणे मागे पडणार की काय, अशी शंका निर्माण झाली आहे.

देशात सत्तापरिवर्तन झाल्यानंतर शंभर "स्मार्ट सिटी‘ची चर्चा सुरू झाली. अलीकडच्या काळात ती अधिक मोठ्या आवाजात सुरू झाली आहे. मात्र, या "स्मार्ट‘ गलबलाटात पुण्याचा आवाज कुठेही ऐकायला मिळत नाही. राज्यांची राजधानीची शहरे, देशातील प्रमुख तीर्थस्थळे यांचा "स्मार्ट सिटी‘ योजनेत समावेश केला जाणार आहे. त्यामुळे उर्वरित 43 "स्मार्ट‘ शहरांसाठी देशभरातील शहरांतून निवड केली जाणार आहे, असे केंद्राच्या नगरविकास खात्याने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पुण्याला या ठिकाणी पोहोचायचे असेल तर स्पर्धा किती तीव्र आहे, हे स्पष्ट होते.

अन्य राज्यांनी विशेषतः मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश (नवीन), गुजरात, कर्नाटक या राज्यांनी स्मार्ट सिटी संकल्पना त्वरित समजावून घेऊन त्या दिशेने पावले टाकण्यास सुरवातही केली आहे. येथे महाराष्ट्र काहीसा मागेच असल्याचे चित्र आहे; परंतु नागपूर शहराने यात आघाडी घेतली आहे, अशी माहिती मिळाली. शहराचे नेतृत्व करणारे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी हे केंद्रात मंत्री असल्याने त्यांनी नागपूरसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. आता तर राज्याचे मुख्यमंत्रीही नागपूरचेच आहेत. पुण्यात मात्र या संकल्पनेची माहिती घेण्यासाठी नगरविकास खात्याकडे कोणीही गेलेले दिसत नाही.

केंद्रीय नगरविकास खात्याच्या वेबसाइटवर "स्मार्ट सिटी‘ म्हणजे काय, ते निवडण्याची प्रक्रिया काय असेल, 43 "स्मार्ट‘ शहरांच्या यादीत समावेश होणाऱ्या शहरांनी काय करायचे आहे इत्यादी सविस्तर तपशील देण्यात आला आहे. "स्मार्ट‘ शहरांना अभ्यास आणि प्रकल्प अहवालासाठी केंद्र सुमारे पाच हजार कोटी रुपये देणार आहे, त्यात पुण्याने वाटा सांगण्याची गरज आहे.

**पुण्यात कार्यशाळा**

हे "स्मार्ट सिटी‘ प्रकरण काय आहे, यावर चर्चा व्हावी या उद्देशाने अमानोरा पार्क टाऊनने "पुणे ग्लोबल स्मार्ट सिटी‘ या कार्यशाळेचे आयोजन केले होते. **सिटी कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध देशपांडे यांनी सादरीकरण केले, तर घनकचरा निर्मूलनासाठी जगात कोणते मॉडेल वापरले जात आहे याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माजी सदस्य सचिव डॉ. दिलीप बोराळकर यांनी माहिती दिली.** खासदार

अनिल शिरोळे, महापौर दत्तात्रेय धनकवडे, उपमहापौर आबा बागूल, आमदार माधुरी मिसाळ, मेधा कुलकर्णी आदींसह देशाच्या विविध भागांतून आलेल्या प्रतिनिधींनी कार्यशाळेत सहभाग घेतला. "स्मार्ट सिटी'साठी पुण्याने आतापासून प्रयत्न करण्याची गरज आहे, असा सूर या वेळी निघाला. मात्र, लोकप्रतिनिधी ठोसपणे काही सांगू शकले नाहीत. या योजनेत समावेश होण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करू, असे खासदार शिरोळे म्हणाले. तर, अटी पूर्ण करण्यासाठी गरज भासल्यास स्वतंत्र अधिकारी नेमू, असे महापौरांनी सांगितले.

**शहरांमध्ये स्पर्धा**

"स्मार्ट सिटी' प्रकल्प म्हणजे "जेएनएनयूआरएम'प्रमाणे योजना नाही, त्यामुळे अर्ज केला आणि निवड झाली असे होणार नाही. केंद्राने त्यासाठी शहरांमध्ये स्पर्धाच लावली आहे. निर्धारित 24 अटी पूर्ण करा मग आमच्याकडे या, असे केंद्राच्या नगरविकास खात्याने स्पष्ट केले आहे. अशा शहरांचा प्रस्ताव राज्य सरकारने द्यायचा आहे आणि त्यानंतर केंद्र, राज्य आणि संबंधित शहराची स्थानिक स्वराज संस्था यांच्यात समझोता होऊन "स्मार्ट' यादीत समावेश होईल.